महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
**१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१**

w'site : www.dydepune.com
e-mail : dydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

**जाक्र.शिउसं/पुणे/उमा-४०१/** २०२२ /२६७२ दि.९/३/२०२२

21 MAR 2022

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे, अहमदनगर व सोलापूर

२) लेखाधिकारी,लेखापरीक्षण पथक, पुणे, अहमदनगर व सोलापूर

३) अधिक्षक,वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक)
पुणे, अहमदनगर व सोलापूर

**विषय:- पुणे कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात संघटनेसोबत सहविचार सभा आयोजित करणेबाबत –**

संदर्भ:- पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना,पुणे यांचे पत्र क्र.३४, दि. १३/१०/२०२१

उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार पुणे विभागातील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसंदर्भात व जिल्हास्तरावरील प्रलंबित प्रश्नांसंदर्भात चर्चा करण्यासाठी **दि. २२/२/२०२२ रोजी दु. १२.३० वा.** आर सी.एम.गुजराथी हायस्कूल, पुणे येथे सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेचे इतिवृत्त सोबत जोडलेले आहे.

**(औदुंबर उकिरडे)**
विभागीय शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे

**प्रत:** अध्यक्ष/ सरचिटणीस, पुणे विभागीय कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटना, पुणे

## शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे कार्यालय

**विषय : विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे यांचेसमवेत सहविचार सभा इतिवृत्त.**

**ठिकाणः आर सी एम गुजराती हायस्कूल, पुणे हॉल**

दि. २२.०२.२०२२ वेळ : दु.१२.३०वा.

---

मंगळवार दि.२२.०२.२०२२ रोजी दु.१२.३० वाजता मा. श्री. औदुंबर उकिरडे, शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे., यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षक संघटना, पुणे, यांचेसमवेत सहविचार सभा आयोजित करण्यात आली होती. बैठकीस संघटना पदाधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक), लेखाधिकारी, अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे, अहमदनगर, सोलापूर, उपस्थित होते.

सुरुवातीस सर्वांचे स्वागत करुन बैठकीत पुढीलप्रमाणे विषयावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले .

विषय क्रमांक १) मागील दि. ७.१२.२०१९रोजी झालेल्या सहविचार सभेचे इतिवृत्त वाचून आढावा घेणे.

- दि. ७.१२.२०१९रोजी कनिष्ठ महाविदयालयीन संघटना यांची बैठक संगमनेर येथे झाली होती, बैठकीचे इतिवृत्त तत्का. शिक्षण उपसंचालक, श्री. प्रविण अहिरे यांच्या चौकशीच्या अनुषंगाने लाचलुचपत विभागाने सर्व अभिलेखे ताब्यात घेतले असल्याने उपलब्ध नाहीत.

मागील मिटींगमध्ये हा विषय घेण्यात आला होता, श्रीम.गुंजाळ,रुपवते ज्युनिअर कॉलेज, हया सेवाजेष्ठ असतानाही फोनवर नकार घेवून पदोन्नती दिलेली नाही, दि.४.०६.२०२१ रोजी शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्जही दिलेला आहे. संघटनेमार्फतही विषय मांडला आहे. मा.टेमकरसाहेबांच्या स्वाक्षरीचे पत्र आहे, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक पद रिक्त ठेवू नये. शासननिर्णयाप्रमाणेही तात्काळ पद भरण्याचे आदेश असतानाही श्रीम. गुंजाळ यांना मान्यता दिलेली नाही.

याबाबत सेवाजेष्ठतेनूसार शिक्षणाधिकारी यांनी आठ दिवसात निर्णय घेणेबाबत सूचित करण्यात आले.

विषय क्रमांक २) सन २०१९-२०मधील घडयाळी तासिका अर्धवेळ शिक्षक संच मान्यता आढावा घेणे.

- सन २०१९-२० च्या संच मान्यता झालेल्या आहेत, प्रत्येक जिल्हयाच्या सहा.शिक्षण उपनिरीक्षक यांचे वाटपासाठी दिलेल्या आहेत, ज्या झालेल्या नाहीत त्या त्रुटी कळविलेल्या आहेत, त्यांची आठ दिवसात त्रुटी पूर्तता करून कार्यवाही केली जाईल, असे सहा.संचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक ३)   २ मे २०१२ नंतर नियुक्त झालेल्या कमवि शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतांच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

- दि.४.०५.२०२०च्या शासननिर्णयानूसार फक्त अल्पसंख्यांक संस्थांच्या मान्यता झालेल्या आहेत. असे वि.शि.उपसंचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक ४)   विनाअनुदानितकडून अनुदानितकडे बदली झालेल्या अर्धवेळ व पूर्णवेळ शिक्षक मान्यतांचा आढावा घेणे.

- विनाअनुदानितकडून अनुदानितकडे बदली झालेल्या अर्धवेळ व पूर्णवेळ मान्यता तपासण्यात येतील कार्यालयातील जावक क्रमांक व दिनांकाने मान्यता दिलेली आहे ते तपासून बदली मान्यता देण्यात येईल, असे सहा.संचालक यांनी सांगितले. प्रलंबित बदली मान्यतांचे कामकाज आठ दिवसात पूर्ण होईल असे शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले.

एका शाखेतून दुसऱ्या शाखेत बदली झालेल्या शिक्षकांना बदली मान्यता प्राचार्यांकडून प्रस्ताव पाठवणे व मान्यता घेणे आवश्यक आहे.

विषय क्रमांक ५)   नियमित वेतनश्रेणी मान्यता व वरिष्ठ वेतनश्रेणी मान्यतांचा आढावा घेणे.

- नियमित वेतनश्रेणीतील एकूण ७० प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेले होते, त्यापैकी ४२ प्रस्तावावर कार्यवाही पूर्ण झालेली असून २८ प्रस्तावांना त्रुटी कळविल्या आहेत. निवडश्रेणीसाठी एकूण ९७ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ६१ प्रस्तावावर कार्यवाही पूर्ण झालेली असून ३६ प्रस्तावांना त्रुटी कळविल्या आहेत.

त्रुटी पूर्तता झाल्यानंतर नियमित वेतनश्रेणी व निवड वेतनश्रेणी बाबतचे प्रस्ताव निकाली काढण्यात येतील.

शिक्षण सेवक म्हणून ३ वर्षे अर्हताकारी व समाधानकारक सेवा झालेल्या प्रशिक्षित शिक्षण सेवकास नियमित वेतनश्रेणीत मान्यता मिळणेसाठी काही संस्था प्रस्ताव देत नाहीत. शासन निर्णय दि.१४/१०/२०१० नुसार शिक्षण सेवकाचा ३ वर्षे अर्हताकारी व समाधानकारक सेवा कालावधी पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याचे आत संस्थेने संबंधित शिक्षण सेवकाचा नियमित वेतनश्रेणी मान्यता प्रस्ताव न दिल्यास व त्याबाबत संबंधित शिक्षण सेवकाने वि. शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे तक्रार दाखल केली असल्यास प्रस्ताव सादर करणेबाबत संबंधित संस्थेस पत्र दिले जाईल.त्यानंतरही प्रस्ताव न आल्यास शासन निर्णय दि.१४/१०/२०१० नुसार मुख्याध्यापकास प्रस्ताव पाठविण्याबाबत पत्र देण्यात येईल व मुख्याध्यापकाने दिलेल्या प्रस्तावावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

विषय क्रमांक ६)   वैदयकीय प्रतिपूर्ती बिलांचा आढावा.

- प्रलंबित वैदयकीय देयके ३१.०३.२०२२ पर्यंत पूर्ण होतील असे सहा.संचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक ७) मूल्यांकन प्राप्त घोषित व अघोषित युनिट व तुकडया यांची माहिती घेणे.

- शासन आदेशानूसार पुणे विभागातील (अहमदनर, पुणे, सोलापूर) प्रपत्र अ मध्ये एकूण १३० प्रस्ताव, प्रपत्र ब मध्ये एकूण ११९ प्रस्ताव प्राप्त झाले असून प्रपत्र क मध्ये एकूण १५३ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. व ते तपासून मा.संचालक (माध्य. व उच्च माध्य.) यांना सादर करण्यात आलेले आहेत.

विषय क्रमांक ८) दि. ७.१२.२०१९ रोजी झालेल्या सहविचार सभेत ठरल्याप्रमाणे सातव्या वेतन आयोगातील वेतन निश्चितीसाठी शिबिराच्या आयोजनाची माहिती घेणे.

- सातव्या वेतन आयोगातील वेतन निश्चितीसाठी शिबिराच्या आयोजनाबाबत शिक्षणाधिकारी यांना सूचना देण्यात आली.

विषय क्र.९) सन २०१०-११ पूर्वीची वगळलेली प्रस्तावित पदे व पुढील वर्षनिहाय सन २०१९-२० अखेरपर्यंत पदांचा जिल्हानिहाय आढावा घेणे.

- प्रस्तावित पदांची कार्यालयाकडे प्राप्त झालेली सर्व पदे मा. संचालक यांच्याकडे पाठविलेली आहेत.

विषय क्र.१०) जिल्हानिहाय माध्यमिक शिक्षणाधिकारी लेखाधिकारी,अधीक्षक वेतन पथक यांच्या कार्यालयाकडील प्रश्नांबाबत जिल्हानिहाय आढावा घेणे.

- शिक्षणाधिकारी यांनी जिल्हास्तरावरील आढावा घेण्यासाठी वर्षातून दोन वेळा संघटनांची सभा घेण्याच्या सूचना मा. शिक्षण उपसंचालक यांनी दिल्या.

शिक्षण उपसंचालक यांच्याकडून मान्यता होऊनही व मा.राज्यमंडळ अध्यक्ष यांचेकडून शालार्थ होऊनही वेतन पथक अधीक्षक यांनी वेतन सुरु केले नसल्याचे अनेक प्रकरणे निदर्शनास आल्याचे संघटना प्रतिनिधी यांनी सांगितले. विशेषतः सोलापूर वेतन पथक (माध्य.) यांचेकडे अशी प्रकरणे असल्याचे निदर्शनास आणले. त्यावर वि.शि. उपसंचालक यांनी मान्यता दिल्यावर वेतन पथक अधीक्षक यांना ती तपासता येणार नाही.असे वि.शि. उपसंचालक यांनी सांगितले.त्यामुळे मान्यता व शालार्थ होऊन वेतन काढण्यासाठी प्रकरणे प्रलंबित असल्यास आठ दिवसात निकाली काढावीत असे सहा.शिक्षण संचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक ११) शालार्थ आयडी साठी आपल्या कार्यालयात शिफारशीसाठी दाखल झालेल्या प्रस्तावावर आपली शिफारस होवून सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी मा. विभागीय अध्यक्ष, शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठवावेत.

- शालार्थ आयडी साठीचे १० ते १२ प्रस्ताव प्रलंबित आहेत, आठ दिवसात कार्यवाही पूर्ण होईल असे मा. शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक १२) नैसर्गिक तुकडी वाढीचे प्रस्ताव, बोर्ड सांकेतांक क्रमांक मिळण्याचे प्रस्ताव, सेवाखंड क्षमापित करण्याचे प्रस्ताव, माहिती तंत्रज्ञान व इतर विषय सुरु करण्याचे प्रस्ताव, सेवादाखले

मिळण्याचे प्रस्ताव, शाळा दर्जावाढ व नवीन शाळा सुरु करण्याचे प्रस्ताव, इत्यादीबाबत कार्यवाही तातडीने व्हावी.

- नैसर्गिक तुकडी वाढीचे प्रस्ताव, बोर्ड सांकेतांक क्रमांक मिळण्याचे प्रस्ताव, सेवाखंड क्षमापित करण्याचे प्रस्ताव, माहिती तंत्रज्ञान व इतर विषय सुरु करण्याचे प्रस्ताव, सेवादाखले मिळण्याचे प्रस्ताव, शाळा दर्जावाढ व नवीन शाळा सुरु करण्याचे प्रस्ताव काहीही प्रलंबित नसल्याचे सहा.संचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक १३) डीसीपीएस धारक कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षकांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या समान पाच हप्त्यापैकी पहिला हप्ता सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत जमा झालेला नाही याबाबत वेतन पथकांना आपल्यास्तरावरुन निर्देश व्हावेत.

- शासनाकडून अनुदान प्राप्त होताच १ला हप्ता देणेबाबत वेतन पथक अधिक्षक यांना सूचित करण्यात आले.

विषय क्रमांक १४) पुणे जिल्हयाचे पगार केव्हांच शासनाने घालून दिलेल्या कालमर्यादेत होत नाहीत मे महिना संपला तरी अदयाप एप्रिलचे पगार नव्हते.

- वेळेत येणारी देयके वेळेत सादर करावीत, उशिरा येणारी वेतन देयके दुस-या लॉटमध्ये सादर करावीत, म्हणजे वेळेत सादर केलेल्या देयके वेळेत पारीत होतील, असे शिक्षण उपसंचालक यांनी सांगितले.

विषय क्रमांक १५) पुणे जिल्हयातील अनेक कनिष्ठ महाविदयालयीन शिक्षकांच्या थकीत वेतनाच्या रकमा प्रदीर्घ कालावधीनंतरही अदयाप जमा झाल्या नाहीत.

- शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर थकीत वेतनाच्या रकमा जमा करता येतील, असे अधिक्षक, वेतन पथक यांनी सांगितले.

विषय क्रमांक १६) वेतनदेयका सोबत माहिती सादर करावयाची असल्यास वेतन देयक सादर करण्यापूर्वी कळविण्यात येत नाही.

- वेतनदेयका सोबत माहिती सादर करावयाची असल्यास वेतनदेयक सादर करण्यापूर्वी कळविण्याबाबत अधिक्षक, वेतन पथक यांना सूचित करण्यात आले.

विषय क्रमांक १७) शालार्थ प्रणालीमध्ये वेतन देयक तयार करताना काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास वेतन पथकाकडून योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध होत नाही अशा बाबतीत वेतन पथकाकडून टाळाटाळ केली जाते.

- शालार्थ प्रणालीमध्ये वेतन देयक तयार करताना काही तांत्रिक अडचणी उदभवल्यास वेतन पथकाकडून योग्य ते मार्गदर्शन उपलब्ध करुन देणेबाबत अधिक्षक, वेतन पथक यांना सूचित करण्यात

ऐनवेळचा विषय : १) संघटना बैठक यापुढे प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी बैठकीचे नियोजन करणेबाबत शिक्षणाधिकारी यांना सूचित करण्यात आले.

सभेच्या शेवटी उपस्थित सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

**(औदुंबर उकिरडे)**
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे